नियमित फौ. ख. क्र. ४/२०२०
सरकार -वि.- रेहमत
नि.क्र. १८.

सरकार तर्फे साक्षीदार क्र.३ यांची जबानी

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नाव - श्रीचंद हरीचंद पवार
वय ३८ वर्षे, व्यवसाय – पो.ना. ब.क्र. २५५०
राहणार - पोलीस स्टेशन उमरेड ता. उमरेड, जि. नागपूर.

**सरतपासणी-सहायक सरकारी अभियोक्ता श्री एस.एस.मोरे यांचे मार्फत**

१. मी आरोपीला ओळखतो. तो आज न्यायालयात हजर नाही. दिनांक २५.१०.२०१९ रोजी मी पोलीस स्टेशन भिवापूर येथे पो.शि. म्हणून कार्यरत होतो. त्यादिवशी मी पारवे पेट्रोल पंपाजवळील चेक पोस्टवर असताना गुप्त माहितीद्वारे खबर मिळाली की, एक आयशर गाडीमध्ये जनावरे कत्तलीसाठी नेणार आहेत. त्यानंतर मी, विनोद भोयर पो.शि., अजय झाडे यांच्या सह नाकाबंदी केली. त्यानंतर काही वेळाने सकाळी ६.३० वाजताच्या दरम्यार एक टाटा ट्रक येताना दिसला. त्याला थांबवून त्याची विचारपूस केली असता त्यामध्ये गायी व गोऱ्यांसह एकूण ३२ जनावर मिळून आली. त्यानंतर मी पंचांना समन्स दिला. आता मला दाखविलेला समन्स तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१९** देण्यात येते. त्यानंतर भस्मे यांनी पंचांसमक्ष घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा तयार केला. त्यानंतर मी यांनी पोलीस स्टेशनला येऊन फिर्याद दिली. आता मला दाखविलेली फिर्याद तीच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.२०** देण्यात येते.आता मला दाखविलेला छापील प्रथम खबर अहवाल तोच आहे. त्यावर माझी सही

आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.२१** देण्यात येते. पोलीसांनी माझे बयान घेतले होते.

**सरतपास संपला.**

**आरोपीचे वकीलांच्या तोंडी विनंती वरुन उलट तपास तहकुब करण्यात येते.**

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,

दिनांक १७.०६.२०२५

स्वा/-
(एस. जे. लाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.